# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/11/2022 (सोमवार) सकाळ

**बनावट तंबाखू तयार करणाऱ्या कारखान्यांवर धाड एकुण 18,93,225/—रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई**

दिनांक २०/०१/२०२२ रोजी चे सुमारास मौजा वेलतूर शिवार, शिवाजी वाठ यांचे शेतात स्थानिक गुन्हे शाखेचे सावनेर पथक हे अवैध धंदयावर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करीत असतांना पाटणसांवगी परीसरात गुप्त माहिती बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन खापा हद्दीतील मौजा वेलतूर शिवारातील शिवाजी रामचंद्र वाठ यांचे शेतातील घरात बनावट तंबाखू तयार करण्याचा कारखाना सुरू आहे. अशी गोपनिय खबर प्राप्त झाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या सावनेर पथकाने पोलीस स्टेशन खापा हद्दीत सापळा रचुन वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन विभाग, नागपूर यांचेशी समन्वय साधून त्यांना सोबत घेवुन मिळालेल्या गोपनीय खबरीच्या आधारे नमुद घटनास्थळी धाड टाकुन कारवाई करण्यात आली. सदर घटने बाबत पोलीस स्टेशन खापा येथे अप.क्र. 366/2022 कलम 26(2)(i), 26(2)(iv), 27(3)(e), 3,30(2)(a), 59 अन्न सूरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम 188, 272, 273, 328 IPC अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयातील आरोपी नामे— १) आनंद बाळाजी वडीचार, वय ५३ वर्ष, रा. दुर्गा नगर, छोटा पुलीया, कळमना नागपूर २) राकेश रामेश्वर निनावे, वय ३२ वर्ष, रा. दहेगाव रंगारी ३) विजय प्रभाकर डूमरे, वय ४६ वर्ष, रा. भरतवाडा रोड, पारडी नागपूर यांच्या ताब्यातुन १) रिकामे झालेले मजा १०८, हुक्का, शिशा, तंबाखु २०० ग्रॅमचे ७६० टिन ९३५/—रू. एकुण १५२ किलो किमती ७,१०,६००/—रू. २) खुला विना लेबलचा सुगंधित तंबाखु ०६ किलोचे ६७ पॅकेट रू. १४,०२५/— १९५ किलो किंमती ९,११,६२५/—रू. सुगंधित तंबाखु एकुण ३४७ किलो एकुण किंमत १६,२२,२२५/— रू. ३) सदर प्रतिबंधीत अन्न पदार्थ पॅकींगसाठी सदर ठिकाणी पुढील साहित्य मिळुन आले. १) रिकामे झालेले मजा १०८, हुक्का शिशा तंबाखुचे २०० ग्रॅमचे टिनाचे डब्बे व डब्यांची झाकणे किमती अंदाजे १०,०००/—रू. २) बाहेरील खरडयाचे रिकामे खोके किमती अंदाजे ३,०००/—रू. ३) पॅकींग करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन मशिन प्रत्येकी किमती अंदाजे ६०,०००/—रू. व बॉक्स पॅकींग पट्टी बंडल ०१ नग किमती अंदाजे १०००/—रू. ४) पोते शिवण्याची शिलाई मशिन किमती अंदाजे २०,०००/—रू. ५) ३० किलो कपॅसिटीचा ईलेक्ट्रीक वजन काटा ०१ नग किमती अंदाजे १५,०००/—रू. ६) रिकामे पाऊच १६ चुंगळया किमती अंदाजे १०,०००/—रू. ७) दिनांक व बॅच नंबर छापायची ईलेक्ट्रीक मशिन ०२ नग किमती अंदाते ४०,०००/—रू. ८) लोखंडी कोठया ०२ नग किमती अंदाजे ६,०००/—रू. असा एकुण १८,९३,२२५/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी नामे—दूर्गेश विजय अग्रवाल, वय ३१ वर्ष रा. बडा हनुमान मंदीराजवळ, ओल्ड मानकापुर नागपूर अदयापपावेतो मिळुन आलेला नाही.

नमुद आरोपीतांना सध्या पोलीस स्टेशन खापा यांच्या ताब्यात दिले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन खापा येथील पोलीस निरीक्षक अजय मानकर मो.नं ९४२२९४२७६४ हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संदीप पखाले नागपूर ग्रामीण, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे,

सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, रोशन काळे, पोलीस नाईक आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांनी संयुक्तरित्या पार पाडली.




## घरफोडी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत २२ कि. मी. अंतरावर मौजा पाचगाव येथे दिनांक १९/११/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक २०/११/२२ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– आशिष रमाकांत जयस्वाल, वय ४५ वर्षे, रा. पाचगाव, ता. उमरेड यांच्या देशी दारूच्या दुकानातील सिमेंटची खिडकी फोडुन, आत मध्ये प्रवेश करून काऊंटर मधील ड्रॉप मध्ये ठेवलेले दुकानामधील देशी दारूचे धंदयाचे पैसे किंमती अंदाजे ७०,०००/– रू. घेवुन गेले. त्यापैकी फिर्यादीला २८,०००/– रू. भटट्रीच्या मागे मिळुन आले. उर्वरीत ४२,०००/–रू. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरी करून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठमके, मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर